**पार्श्वभूमी**

महाराष्ट्र शासनाने शिक्षणसेवक पदासाठी २०१० मध्ये परीक्षा घेतल्या होत्या. त्या परीक्षेमध्ये अडीच लाख परीक्षार्थी बसले होते. त्यापैकी १४७०० गुणवत्ताधारक उमेदवारांची शिक्षणसेवक म्हणून नेमणूक करण्यात आली. या गुणवत्ता यादीत संपूर्ण राज्यातील सर्वच जिल्ह्यातील तरुण होते. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुलांचा या यादीत समावेश होता. रत्नागिरी व सिंधुदुर्ग सोडून बाकी सर्व जिल्ह्यामध्ये शिक्षणसेवक जून २०१० पासून रुजू झाले. १८ जून व २२ जून रोजी अनुक्रमे सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथे मुलाखतीसाठी निमंत्रित केलेल्या शिक्षणसेवकांवर स्थानिक गुंडांनी हल्ला केला. प्रशासन व पोलीस यांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली असे नव्हे तर त्यांनी या तरुणांना दम देऊन परत जायला सांगितले. अशा शिक्षणसेवकांची एकूण संख्या १६४५ आहे. त्यात मुलींचाही समावेश आहे. त्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नारायण राणे यांच्या पत्रानुसार तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शिक्षणसेवकांच्या नियुक्तीवर 'स्थगिती आदेश' दिला. त्यांचे म्हणणे असे होते की कोकण मागासलेला आहे तेव्हा रत्नागिरी व सिंधुदुर्गमध्ये फक्त रत्नागिरी व सिंधुदुर्गमधील उमेदवारच शिक्षणसेवक म्हणून लागतील. हा जिल्हावादाचा नवीन अनुचित पायंडा पडू लागला होता. त्याचवेळी भाजपचे रत्नागिरीमधील आमदार प्रमोद जठार व शिवसेनेचे आमदार राजन साळवी या दोघांनीही जिल्हावादास खतपाणी घातले. या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी पिडीत शिक्षणसेवकांनी २४ वेळा विविध पक्ष व संघटनामार्फत आंदोलन केले. परंतु त्यांची दाद कोठेच घेतली जात नव्हती. निराश मनस्थितीत काही शिक्षणसेवकांनी पुण्यातील सारसबागेच्या मैदानात युक्रांदच्या पदाधिकाऱ्यांची ( विकास लवांडे, संदीप बर्वे, गोपाळ गुणाले, भाग्यश्री कापुरे) यांची भेट घेतली.

**सुरुवात**

युक्रांदने हा प्रश्न हाती घेतल्यावर जानेवारीमध्ये राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक श्री. एम. आर. कदम यांच्या कार्यालयासमोर जानेवारीमध्ये धरणे आंदोलन केले व त्यांना निवेदन दिले. त्यानंतर शिक्षणमंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांची भेट घेऊन त्यांनाही शिक्षणसेवकांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी निवेदन दिले. त्याचवेळी शिक्षणसेवकांनी सत्याग्रहाची तयारी सुरु केली. सत्याग्रह चालू करण्याआधी युक्रांदच्या कार्यकर्त्यांनी २ अटी घातल्या. एक राडेबाजीचा विचारही मनांत आणायचा नाही व दुसरी एकी भंग होऊ द्यायची नाही.

घटनाक्रम

५ फेब्रुवारी २०११ पासून पुण्यात सेंट्रल बिल्डिंग या शासकीय ईमारतीच्या पादचारी मार्गावर २५० तरुणांनी सत्याग्रही बैठकीचे रणशिंग फुंकले. त्यात १५- २० तरुणीही सामील होत्या. हे सत्याग्रही तरुण तेथेच निवास करून राहिले. पुणे रेल्वे स्टेशनवर बाकी सर्व गोष्टी उरकायचे. त्यांनी कोणत्याही गोष्टीची कधीही कुरकुर नाही केली. युक्रांदचे संघटक विकास लवांडे हे २४ तास पूर्ण वेळ त्यांच्या सोबत राहिले. डॉ. कुमार सप्तर्षी त्यांना मधूनमधून भेटत व सत्याग्रह शास्त्र सांगत असत. संदीप बर्वे, अतिक शेख या कार्यकर्त्यांनी आंदोलनाची पूर्ण जबाबदारी घेतली होती. या सर्व कालावधीत जेवणाची व्यवस्था लोकवर्गणीतून होत होती. दररोज रात्री मुक्तपीठ सुरु होई. त्यामध्ये प्रत्येक तरुण संवाद साधत असे. यातून असे लक्षात आले की हे सर्वे तरुण छोट्या खेड्यातील ( २००० लोकवस्तीपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या) आहेत. शिक्षनसेवकांचे वेतन ही ३०००/- इतकेच आहे जे किमान वेतन कायद्याचा भंग करते. या मुक्तापीठातून अनेक आंदोलकांचे सामाजिक भान विकसित झाले.

अखेर २२ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ना. नारायण राणे, शिक्षणमंत्री ना. राजेंद्र दर्डा संबंधीत सचिव यांच्या संयुक्त बैठकीत अशोक चव्हाणांचा या दोन जिल्ह्यातील नियुक्तीवरचा स्थगिती आदेश रद्द करण्यात आला.

तात्पर्य

कोणत्याही सामाजिक अन्यायाविरुद्ध सत्याग्रही मार्गाने लढा दिला जाऊ शकतो. हा लढा सत्याग्रही युद्धाशास्त्राच्या नियमाचे काटेकोर पालन करून झाला म्हणून तो यशस्वीही झाला. या लढ्यात चढाईचे एकच तत्व गुंफण्यात आले होते ते म्हणजे आक्रमक अहिंसेचे तत्व.